वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)
२) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय खराळवाडी यांचे दि.०५/०२/२०१६ रोजीचे पत्र
३) मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/१५, दि.२०/१०/२०१५
४)मा.लेखाधिकारी यांचे कडील दि.३०/१/२०१६ चे घरबांधणी अग्रीम ना हरकत प्रमाणपत्र
५) मा.शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग यांचेकडील दि. ०७ /०३ /२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/२९६/१६
दि. ०७ /०३/२०१६

**विषय – <u>नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.</u>**
**श्री.देशमुख राम त्रिंबकराव, सहा.शिक्षिक**
**(संगणक क्रं.५८३०)**

आदेश,

**श्री.देशमुख राम त्रिंबकराव, सहा.शिक्षक** हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.२३/०६/१९८६ रोजी रूजू झालेले आहेत **श्री.देशमुख राम त्रिंबकराव,** सहा.शिक्षक, यांची जन्मदिनांक १९/०३/१९५८ अशी असून त्यांच्या वयास दिनांक ३१/०३/२०१६ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने **श्री.देशमुख राम त्रिंबकराव, सहा.शिक्षक** यांना ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल,त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल,तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल,अशी महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे **श्री.देशमुख राम त्रिंबकराव,** सहा.शिक्षक हे दिनांक ३१/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होतील.

**श्री.देशमुख राम त्रिंबकराव,** सहा.शिक्षक, यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नसून त्यांचेकडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज,संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत.घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र. ४ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. तसेच **श्री.देशमुख राम त्रिंबकराव,** सहा.शिक्षक यांना सेवासातत्य देण्यात आलेले आहे. ज्यांना सेवासातत्य दिलेले



Scanned with CamScanner

आहे. भविष्यात लेखा परीक्षणाची वसुली निघाल्यास त्यांची संपुर्ण रक्कम पेन्शन मधुन वसु करणेत येईल. **श्री.देशमुख राम त्रिंबकराव, सहा.शिक्षक** यांचे सेवानियृतीबाब मुख्याध्यापकांनी शिफारस केली आहे.

सबब,मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालि पिंपरी ४११ ०१८,उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये विभाग प्रमुख म्हणुन मला प्रदान केलेल अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरत या आदेशान्वये **श्री.देशमुख राम त्रिंबकराव**, सहा.शिक्षक यांना दिनांक ३१/०३/२०१६ रोज मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्या येत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्री.देशमुख राम त्रिंबकराव, सहा.शिक्षक यांचे सेवानो पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रती,

श्री.देशमुख राम त्रिंबकराव, सहा.शिक्षक
माध्यमिक विद्यालय खराळवाडी

प्रत:- १) लेखा शाखा

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष, ( प्रशासन ) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४

४) माध्यमिक विद्यालय नेहरुनगर

२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner